# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे / कालमर्यादा / ईमेलद्वारे**
क्रमांक: संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा, 1263 दिनांक : 15 NOV 2018

**"परिपत्रक"**

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व खाजगी व विनाअनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याबाबत....**

**संदर्भ :**
1. **प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाचे पत्र क्र. संकीर्ण/ प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/१९८, दिनांक ९/१०/२०१८.**
2. **प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाचे दिनांक ३१/१०/२०१८ रोजीचे परिपत्रक.**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश नियामक प्राधिकरणाकडील प्रवेश प्रक्रियेचे संपूर्ण कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याच्या अनुषंगाने "नोंदणी प्रक्रिया" पूर्ण करण्याकरिता संबंधीत महाविद्यालयांना यापूर्वी प्राधिकरणाच्या संदर्भ क्र. १ व २ अन्वये मूदत वाढ देण्यात आली होती. तथापि, अद्याप अनेक महाविद्यालयांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण न केल्याचे दिसून येते.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया या सर्व बाबींसाठी महाविद्यालयांची नोंदणी ही प्रक्रिया अत्यंत आवश्यक असून, सदर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत महाविद्यालयांनी निष्काळजीपणा, दिरंगाई तथा सदर प्रक्रियेचे गांभीर्य दुर्लक्षीत केल्याचे दिसून येते.

प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची बाब लक्षात घेऊन, अशा सर्व कर्तव्यात कसूरदार महाविद्यालयांना दिनांक १६/११/२०१८ ते १९/११/२०१८ या कालावधीत एक शेवटची संधी देण्याकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे, तथापि, संबंधीत महाविद्यालयांना प्रति प्रवेशित

विद्यार्थी रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) व कमाल रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) विलंब शुल्क अदा करण्याच्या अटींवर सदरची मुदतवाढ देण्यात येत आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदींचे गांभीर्य लक्षात घेऊन, वरील कालावधीत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे संबंधीत महाविद्यालयांना बंधनकारक राहील. तसेच या संदर्भात तद्नंतर प्राप्त होणाऱ्या विनंती/निवेदनांचा विचार केला जाणार नाही, **तसेच तद्नुषंगाने ज्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यतेअभावी भविष्यात उद्भवणाऱ्या अडचणींस संबंधीत महाविद्यालय/संस्था व संचालक जबाबदार राहतील,** याची कृपया नोंद घ्यावी.

(आ.ए. रायते) भा.प्र.से.
**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.**

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी तथा उक्त निर्देश संचालकांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या विनंतीसह अग्रेषित,-

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
५. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे
७. कुलसचिव, पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर

प्रत,-
निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.